सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर-२, पुणे यांचे कार्यालय,

टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय इमारत, २ रा मजला, शुक्रवार पेठ, पुणे-४११००२

ईमेल- dyrcspunecity२@gmail.com

दूरध्वनी क्र.०२०-२४४३३३१३

जा.क्र.उनिपुश(२)/गृह/सरस्वती/पुर्नविकास/ना.ह.प्र/२०२४/306 दि. १६/०५/२०२४

**प्रति,**

चेअरमन/सचिव,
द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
८१९-अे, भवानी पेठ, पुणे-४११०४२

**विषय:- संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासास ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत...**

**संदर्भ:-** १) आपलेकडील दिनांक-०३/०५/२०२४ रोजीचे प्राधिकृत अधिकारी पाठविणेबाबतचे पत्र.

२) या कार्यालयाकडील जा.क्र.उनिपुश(२)/गृह/सरस्वती/पुर्नविकास/सभा/प्रतिनिधी/२३३/२०२४ दिनांक ०६/०५/२०२४ रोजीचे पत्र.

३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय सगृयो२०१८/प्र.क्र.८५/१४-स, दिनांक ०४ जुलै २०१९ रोजीचे पत्र.

४) श्री. आर.पी. बनाईत, सहाय्यक सहकारी अधिकारी यांचेकडील दि.०७/०५/२०२४ रोजीचा सभा अहवाल.

५) सचिव, द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्या., ८१९-अे, भवानी पेठ, पुणे-४११०४२ यांचेकडील दिनांक १०/०५/२०२४ रोजीचा नाहरकत प्रमाणपत्र मागणीबाबतचा प्रस्ताव.

वरील संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधणेत येते की,

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्या., ८१९-अे, भवानी पेठ, पुणे-४११०४२ या संस्थेने संदर्भ क्र.०१ अन्वये दिनांक ०३/०५/२०२४ रोजी या कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला असुन या कार्यालयाचा प्रतिनिधी पाठविण्याबाबत आपण या कार्यालयास विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.०२ अन्वये या कार्यालयातील प्रतिनिधी म्हणुन श्री. रमाकांत बनाईत, सहाय्यक सहकारी अधिकारी हे सभेस उपस्थित राहीलेले होते. सदर विकसक निवडीची सभा दिनांक ०६/०५/२०२४ रोजी घेण्यात आलेली असुन त्यांनी संदर्भ क्र.०४ अन्वये या कार्यालयास सादर केलेल्या अहवालात नमुद केले आहे की, सदर दिवशी संस्थेतील एकुण ५७ सभासदांपैकी ४४ सभासदांनी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सहभाग नोंदविलेला असुन मतदानात भाग घेतलेला आहे म्हणेजच २/३ सभासद सदर सभेमध्ये सहभागी असुन सभेचा कोरम पुर्ण झाल्याचे दिसुन येते.

तसेच, संस्थेच्या पुर्नविकासाकरीता सहभागी असलेल्या सभासदांपैकी ३७ सभासदांनी "राणावत ग्रुप" यांची आपले विकसक म्हणुन मान्यता दिली असुन सदर सभेचे छायाचित्रण करण्यात आलेले आहे.

संस्थेच्या प्रस्तावावरुन व विशेष साधारण सभेच्या इतिवृत्तावरुन सभासदांनी सक्रीयपणे सहभाग घेतलेला दिसुन येतो. तसेच हजर असलेल्या सभासदांपैकी ५१% पेक्षा जास्त सभासदांनी "राणावत ग्रुप" यांची विकसक म्हणुन निवड केल्याचे दिसुन येते. त्याबाबत संस्थेच्या ४२ सभासदांच्या संमतीदर्शक सहया

आहेत. याचा एकत्रित विचार करुन द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्या., ८१९-अे, भवानी पेठ, पुणे-४११०४२ या संस्थेच्या पुनर्विकासासाठी "राणावत ग्रुप " यांची विकसक म्हणुन नियुक्ती करण्यास व पुनर्विकास योजना राबविण्यास या कार्यालयास दाखल कागदपत्रांच्या आधारे खालील अटी - शर्तीस अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. संस्थेच्या साधारण सभेने मंजूर केलेल्या सर्व अटी व शर्तीस अधिन राहून वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या मार्गदर्शनानुसार नोंदणीकृत दस्ताद्वारे विकसकाबरोबर विकसन करार करावा.या करारातील अटी-शर्ती बाबत संपूर्ण जबाबदारी संस्थेची असेल.

२. महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग याचे निर्देश क्रमांक सगृयो २००७/प्र.क्र. ५५४/१४-स दिनांक ०३/०१/२००९ व १९/१०/२०११ मधील मुद्यांचा विकसन करारात समावेश करण्याची दक्षता घ्यावी.

३. पुनर्विकासासाठी निवड, विकसनकरार वा पुनर्विकासाचे काम याबाबत भविष्यात काही वाद वा न्यायालयीन प्रकरण उद्भवू नये यासाठी दक्षता घ्यावी. असा वाद वा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

४. पुणे महानगरपालिका यांनी पुनर्विकासाचे नकाशे मंजूर केल्यानंतर त्याची एक प्रत व विकसन कराराची एकप्रत या कार्यालयात सादर करावी.

५. पुनर्विकासाचे काम विहित कालावधीत व योग्य दर्जाचे होईल यासाठी आवश्यक ती दक्षता संस्थेने घ्यावी.

६. पुनर्विकासाकरीता आवश्यक त्या परवानग्या संबंधितांनी वेळोवळी योग्य त्या प्राधिकरणाकडुन प्राप्त करुन घ्याव्यात.

७. पुनर्विकासाच्या काळात सभासद विस्थापित होत असल्याने या कालावधीत संस्थेचे हिशोब व सभा इत्यादीबाबत दक्षता घ्यावी.

८. संस्थेच्या सभासदत्वामध्ये होणाऱ्या वाढीविषयी त्यांचे नाव व इतर तपशीलासह या कार्यालयास विधीवत पद्धतीने अवगत करावे.

९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१) (अ)व ७९ (१) (ब) अन्वये विहीत केलेली विवरणपत्रे विहीत मुदतीत दाखल करावीत.

१०. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक ) नियम २०१४ अन्वये विहीत नमुना ई-२ या कार्यालयात दाखल करावा.

११. संस्थेने पुनर्विकाससंबधीचे पुढील कामकाज शासन निर्णय दिनांक ०४ जुलै २०१९ मधील मुद्रदा क्र. १८ प्रमाणे करावे.

१२. संस्थेच्या पुनर्विकासाबाबत होणाऱ्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता असण्याची आवश्यकता आहे आणि सभासदांना संस्थेच्या पुनर्विकासाबाबत हवी असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीची राहील.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (२), पुणे
सत्यमेव जयते

(निलम पिंगळे)
**उपनिबंधक, सहकारी संस्था**
**पुणे शहर-२, पुणे**

**प्रत :-**
मे. राणावत ग्रुप, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**
मा. कार्यकारी अभियंता, ...